दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : ४७ ✻ जालना ✻ ✻ गुरुवार १७ सप्टेंबर २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

## जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड; १४ जुगाऱ्यांवर कारवाई

### २५ लाख ८९ हजारांचा मुद्देमाल जप्त



जालना/प्रतिनिधी : चंदनझिरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नियोना शिवारात अवैधरीत्या सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत १४ जुगाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले असून, जुगाराचे साहित्य, रोख रक्कम, मोबाईल फोन तसेच वाहने असा एकूण २५ लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक तेजस्वीसिंग संधू यांच्या विशेष पथकाला चंदनझिरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नियोना शिवारात काही व्यक्ती झन्ना-मन्ना व तिरट नावाचा जुगार मोठ्या पैशांच्या हारजितीवर खेळत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिस निरीक्षक किरण बिडवे व सहायक पोलिस निरीक्षक अविनाश गडाख यांच्या नेतृत्वाखाली दोन पथके तयार करण्यात आली. मंगळवारी (दि. १६) रात्री दोन वाजण्याच्या सुमारास संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला.

पोलिसांची चाहूल लागताच काही जणांनी अंधाराचा फायदा घेत पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून आठ जणांना जागेवरच पकडले. कारवाईदरम्यान विजय लक्ष्मणराव पुंगडवाले (रा. नियोना), राहुल विश्वनाथ शाहापूरकर (रा. नियोना), शेख मोसीन शेख इकबाल (रा. गांधीनगर, जालना), अमजद रफिक सय्यद (रा. गांधीनगर, जालना), विजय कैलास खरे (रा. कन्हैयानगर, जालना), सुनील संतुकराव दाभाडे (रा. थिगळखेडा), समीर जफर खान (रा. संजयनगर, जालना) आणि महेंद्र अशोक आदमाने (रा. नियोना) यांना ताब्यात घेण्यात आले.

घटनास्थळावरून जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य, रोख रक्कम, मोबाईल फोन व वाहने पोलिसांनी जप्त केली. तसेच तपासादरम्यान ईसा शेख, समीर पटेल, सुनील शेजुळ, सुनील म्हस्के (रा. नियोना), विक्की (रा. हिंदनगर, जालना) आणि सचिन मंडल (रा. ढवळेश्वर) यांचीही नावे समोर आली. याप्रकरणी चंदनझिरा पोलिस ठाण्यात **(पान ३ वर)**

## बंगालच्या उपसागरात नवीन प्रणाली

## महाराष्ट्रासह २१ राज्यांना IMD चा अलर्ट

१७ सप्टेंबर २०२६ उद्याचे हवामान अंदाजानुसार मान्सूनबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. बंगालच्या उपसागरात एक नवीन चक्रीवादळ प्रणाली तयार होत आहे. तर ३ नवीन मान्सून प्रणाली सक्रिय झाल्या आहेत. यामुळे भारतात पुन्हा एकदा पावसाचा रोद वाढणार आहे. महाराष्ट्रासह २१ राज्यांना खचऊ ने अलर्ट दिला आहे. हवामान खात्याने मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. नैऋत्य राजस्थानवर कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असल्याने हवामान पुन्हा बदलणार आहे. पूर्व, ईशान्य आणि मध्य भारतातील अनेक राज्यांमध्ये २२ सप्टेंबरपर्यंत मुसळधार पाऊस आणि वादळी पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तर थायलंडच्या मध्य-ट्रोपोस्फियरमध्ये चक्रीवादळी स्थिती कायम आहे. १८ सप्टेंबरच्या संध्याकाळपर्यंत ते उत्तर अंदमान समुद्रात प्रवेश करण्याची शक्यता आहे.




परिणामी १९ सप्टेंबरच्या संध्याकाळपर्यंत त्याच प्रदेशात (उत्तर अंदमान समुद्र) कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. त्यानंतर ते हळूहळू मजबूत होईल आणि पुढील ३-४ दिवसांत पश्चिम-वायव्य दिशेने दक्षिण ओडिशा-उत्तर आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीकडे**(पान ३ वर)**

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम



जालना/प्रतिनिधी : राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहेत. पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे गुरुवार, दि. १७ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ८.१५ वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथे आगमन. सकाळी ८.३५ वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथुन हुतात्मा स्मारक, टाऊन हॉल, जुना जालनाकडे प्रयाण करतील. सकाळी ८.५० ते ८.५५ वाजता हुतात्मा स्मारक स्मृती स्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन मुक्तीसंग्रामातील हुताम्यांना मानवंदना देतील. सकाळी ९.00 ते 10.३0 वाजता टाऊन हॉल येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण व तसेच विविध कार्यक्रमांना उपस्थित राहतील. सकाळी १0.४५ वाजता जालना येथून मुंबईकडे प्रयाण करतील.

## नळडोह येथे अच्युत महाराज दत्तपूरकर यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता ; भव्य महाआरती आणि अन्नदानाचे आयोजन

नळडोह तळणी/प्रतिनिधी ज्या ठिकाणी सतत बदल होत असतो, अशा ठिकाणी अनुष्ठान केले पाहिजे. अशा पवित्र ठिकाणी केलेले अनुष्ठान कधीही निष्फळ ठरत नाही. उलट ते फलद्रूप झाल्याशिवाय राहत नाही, असे प्रतिपादन अच्युत महाराज दत्तपूरकर यांनी नळदुर्ग येथील आपल्या प्रवचनात केले. श्रावण महिन्यानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. जनार्दन स्वामींच्या वास्तव्याने भूमी पवित्र आहे अच्युत महाराज दत्तपूरकर



यांनी नळडोह या स्थानाचे महत्त्व सांगताना स्पष्ट केले की, महान संत जनार्दन स्वामी महाराज यांच्या पावन स्पर्शाने आणि त्यांच्या उपस्थितीने ही भूमी अत्यंत पवित्र झाली आहे. त्यांचे महात्म्य त्रिकालबाधित आहे. जनी जनार्दनाने संतांच्या परंपरेत सांगितले आहे की, ज्या ठिकाणी महापुरुषांची पावले पडतात, ती जागा संतांच्या सान्निध्यामुळे आणि मार्गदर्शनामुळे सदैव चैतन्यमय राहते. जनार्दन **(पान ३ वर)**

## हस्तिनापुर गणेश महोत्सवाचा भव्य आगमन सोहळा; परतूरकरांना प्रथमच अनुभवता आला अनोखा सोहळा

परतूर : हस्तिनापुर गणेश महोत्सवाच्या वतीने यंदाचा भव्य आगमन सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या आगमन सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे जोरदार गंगाआरतीचे नियोजन. परतूर शहरात प्रथमच अशा आगळ्या-वेगळ्या पद्धतीने गंगाआरतीचे आयोजन करण्यात आल्याने भाविकांना एक वेगळाच आध्यात्मिक आणि भक्तिमय अनुभव मिळाला. हस्तिनापुर



गणेश महोत्सवाच्या आगमन सोहळ्याला गणेशभक्त, मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परतूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. ढोल-ताशांचा गजर, जयघोष आणि भक्तिमय वातावरणाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. परतूरमध्ये गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याची परंपरा असून, त्यात दरवर्षी काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याचे हस्तिनापुर गणेश महोत्सवाचे वैशिष्ट्य ठरत आहे. यंदाच्या **(पान ३ वर)**

## जालना महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या परिसरात भंगाराची लूट?

जालना/प्रतिनिधी : जालना महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या कार्यालयाच्या आवारात महानगरपालिकेच्या जुन्या गाड्या आणि मोठ्या प्रमाणात भंगार साहित्य ठेवण्यात आले आहे. मात्र, या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेच्या सुरक्षेकडे महानगरपालिका प्रशासनाचे अक्षरशः दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. जुन्या वाहनांमधील स्पेअर पार्ट चोरट्यांकडून रात्रीच्या वेळी काढून नेले जात असल्याचे दिसून येत असून, अनेक गाड्यांचे महत्त्वाचे पार्ट गायब असल्याचे निदर्शनास येत आहे. विशेष म्हणजे या परिसराला चोहोबाजूंनी संरक्षक भिंत नसल्याने संपूर्ण आवार खुले झाले आहे. दिवसा काही संशयित व्यक्ती या वाहनांची पाहणी करताना दिसतात आणि त्यानंतर रात्रीच्या वेळी वाहनांचे स्पेअर पार्ट तसेच लोखंडी साहित्य चोरीला जात असल्याची चर्चा परिसरात आहे. अशा परिस्थितीत केवळ एक-दोन वॉचमन तैनात करून महानगरपालिकेच्या कोट्यवधींच्या मालमत्तेचे संरक्षण कसे होणार, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. काही दिवसांपूर्वी मंगल बाजार परिसरातील कत्तलखाना तोडण्यात



आल्यानंतर त्यातील भंगार साहित्यही अग्निशमन कार्यालयाच्या आवारात आणून ठेवण्यात आले होते. मात्र, त्यातील साहित्यही चोरीला गेल्याचे निदर्शनास येत असल्याचा दावा केला जात आहे. याशिवाय परिसरातील मोठ्या प्रमाणातील लोखंड चोरीला गेल्याचीही नागरिकांमध्ये चर्चा आहे. धक्कादायक बाब म्हणजे या परिसरात महानगरपालिकेच्या जुन्या घंटागाड्यांसोबतच सध्या वापरात असलेल्या नवीन घंटागाड्याही रात्रीच्या वेळी उभ्या केल्या जात आहेत. त्यामुळे या चालू स्थितीतील वाहनांचेही स्पेअर पार्ट चोरीला जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उद्या एखाद्या वाहनाचा महत्त्वाचा पार्ट चोरीला गेला आणि घंटागाडी रस्त्यावरच बंद पडली, तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

संरक्षक भिंत नसल्यामुळे रात्रीच्या वेळी या परिसरात दारू पिणारे, गांजा सेवन करणारे आणि नशेखोर व्यक्ती ठिय्या मांडून बसत असल्याचेही नागरिक सांगत आहेत. त्यामुळे हा परिसर महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरत असताना संबंधित अधिकारी आणि कर्मचारी नेमके काय करत आहेत, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. महानगरपालिकेने प्रत्येक विभागासाठी जबाबदार अधिकारी नियुक्त केलेले असताना त्यांच्या अधीन असलेल्या वाहनांची, साहित्याची आणि मनपाच्या मालमत्तेची निगराणी करण्याची जबाबदारी संबंधित **(पान ३ वर)**




## मोरया प्रतिष्ठान गणेश मंडळाच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना सुरुवात



नवनाथ गव्हाणे बदनापूर / प्रतिनिधी : गणेशोत्सव केवळ धार्मिक उत्सवापुरता मर्यादित न ठेवता सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून तो अधिक उत्साहपूर्ण करण्याचा संकल्प मोरया प्रतिष्ठान गणेश मंडळ, धोपटेश्वर यांनी केला आहे. मंडळाचे यंदा पहिलेच वर्ष असून पहिल्याच वर्षी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गणेशोत्सवानिमित्त मंडळाच्या वतीने संगीत खुर्ची, वक्तृत्व स्पर्धा यांसह विविध मनोरंजनात्मक व बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांमुळे लहान मुलांपासून तरुणाईपर्यंत सर्वांना आपले कलागुण सादर करण्याची संधी मिळणार आहे. गावातील नागरिकांचा गणेशोत्सवातील सहभाग वाढावा, मुलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे तसेच सामाजिक व सांस्कृतिक वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने मंडळाने हे उपक्रम हाती घेतले आहेत. त्यामुळे धोपटेश्वर परिसरात मोरया प्रतिष्ठानच्या **(पान ३ वर)**



# संपादकीय

## न्यायालयाच्या भितीने प्रशासनाचा प्रस्ताव

मुंबई महापालिकेच्या मलनि:सारण प्रचालने खात्यातील मलनि:सारण प्रचालन व देखभाल सेवांमध्ये वाढ करण्यासाठी सल्लागार सेवा घेण्याच्या कामाला स्थायी समितीने एप्रिल १९९५मध्ये मंजुरी दिली होती. या कंत्राट कामांसाठी कॅनडातील आर व्ही अँडरसन असोशिएट्स लिमिटेड या कंपनीची निवड करण्यात आली होती. यामध्ये युएस डॉलरप्रमाणे २६ लाख ४ हजार १०२ एवढी रक्कम अधिक इतर सीमाशुल्क, आयकर, शुल्कासहित सादिलवार याची ५.0१ कोटी रुपये असे कंत्राट मंजूर करण्यात आले होते. त्यात या कंपनीचे स्थानिक भागीदार हे पीएचई कन्सल्टंट होते. या कंत्राट कामाचा कालावधी हा ७४ महिन्याचा होता आणि एकूण कंत्राट हे १३.९७ कोटींचे होते. हे काम जून २00१मध्ये पूर्ण झाले. यामध्ये मलनि:सारण प्रचालन आणि देखभाल प्रणालीच्या संपूर्ण कार्यपध्दती आणि देखभालीचा अभ्यास करणे आणि सध्या कार्यरत असलेल्या, निर्माणाधीन असलेल्या व पुढील १0 वर्षांत उभारण्याचे नियोजित असलेल्या सुविधांचा समावेश होता.

तर मनसेचे यशवंत किल्लेदार यांनी अधिकाऱ्यांनी या कामाचे पैसे देण्याचे रोखले, यामध्ये त्यांनी कोणत्या त्रुटी काढल्या होत्या का? मग विधी विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या का मांडल्या नाहीत? दोन्ही कोर्टात यांच्या दोन दोन वेळा याचिका फेटाळल्या मग संबंधित अधिकारी काय करत होते असा सवाल करत मलनि:सारण प्रचलन विभाग आणि विधी विभागाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी किल्लेदार यांनी केली. तर सभागृहनेते गणेश खणकर यांनी हा विषय सोपा नसून या खटल्यांसाठी आपण किती रुपये वकीलांच्या शुल्कासह खर्च केले याची माहिती देण्यात यावी अशी सूचना केली. २0 वर्षांनंतर महापालिकेवर आपली खाती बंद करण्याचे निर्देश देण्याची वेळ न्यायालयावर आली आहे. ही मोठी नामुष्की . त्यामुळे मागील दहा वर्षांत किती रुपये न्यायालयांवर खटले चालवण्याठी खर्च केले याची माहिती पटलावर ठेवण्याची मागणी केली. तर शितल म्हात्रे यांनी सिंगापूर डॉलर देण्याची का का भासते असा सवाल केला. त्यानंतर स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी सर्वोच्च न्यायालयाचा निर्देशांचे सन्मान राखून हा प्रस्ताव मंजूर करुन देत आहे. ३ ऑगस्ट रोजी निकाल दिला जातो आणि प्रस्ताव दोन दिवसांपूर्वी सादर केला जातो. त्यामुळे हा प्रस्ताव मंजूर करताना या प्रकरणी कोण कोण जबाबदार आहेत याची चौकशी होणे आवश्यक असून यासर्व प्रकरणांची सर्वंकष चौकशी करून पुढील १५ दिवसांमध्ये याचा अहवाल स्थायी समितीला सादर केला जावा असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिला. याशिवाय टप्पा दोन, टप्पा ३,आणि टप्पा ४ आदींचाही समावेश होता. परंतु २00१मध्ये काम पूर्ण झाल्यानंतरही संबंधित कंपनीच्या कामाचे पैसे न दिल्याने सन २00४पर्यंत ही थकीत कामाची रक्कम व त्यावरील व्याजाच्या रकमेची मागणी केली. परंतु यावर महापालिका प्रशासनाने कोणताही निर्णय घेतला नाही. मुंबई महापालिकेच्यावतीने तब्बल ३१ वर्षांपूर्वी मलनि:सारण प्रचलन कामांसाठी नियुक्त केलेल्या कंत्राटदार आणि सल्लागार कंपनीला केवळ तब्बल ६६ कोटी रुपये देण्याची वेळ आली आहे. मलनि:सारण प्रचलन विभगाच्या अधिकाऱ्यांनी वेळेवर कंत्राटदाराचे पैसे न दिल्यामुळे लवाद आणि न्यायलयानेही महापालिकेविरोधातच निर्णय दिल्यामुळे केवळ १३ कोटींच्या कामांसाठी तब्बल ६६ कोटी रुपये द्यावे लागणार आहे.. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत महापालिकेचे बँक खाते गोठवण्याचा इशारा दिल्यामुळे बुधवारी स्थायी समितीने या प्रस्तावाला मंजुरी देतानाच या प्रकरणांतील सर्व संबंधित खात्यांचे आणि विभागांची चौकशी करून १५ दिवसांमध्ये अहवाल सादर करण्याचे निर्देश स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी दिले आहे. त्यामुळे प्रथम लवादाने महापालिकेच्याविरोधात निर्णय दिला. या निर्णयाविरोधात महापालिकेने उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा प्रयत्न केला. परंतु दोन्ही ठिकाणी त्यांच्या याचिका फेटाळून लवादाने दिलेल्या निर्णयानुसार भरपाई देण्याचे निर्देश दिले होते. त्यामुळे थकीत रक्कम आणि त्यावर १४ टक्के प्रती वर्षी दराने व्याज, याशिवाय युएस डॉलरमध्ये ही रक्कम देतानाच लवादाचाही खर्च देण्यासाठी एकूण ६६ रवपीन शर्मा यांनी हे काम पूर्ण झाल्यांनतर अधिकाऱ्यांनी या कामाचे पैसे न दिल्यामुळे थकीत रक्कम मिळवण्यासाठी कॅनडातील या कंपनीच्यावतीने लवादाकडे बाजू मांडण्यात आली होती. त्यामुळे महापालिकेच्या विरोधात हा निकाल गेल्यामुळे २२ लाख डॉलरच्या तुलनेत ५५ लाख डॉलर आणि १४ लाख रुपयांऐवजी ३८ लाख रुपये देण्याची वेळ आली आहे. तर लवादामध्ये सिंगापूरमधील अधिकारी असल्याने त्यांना सिंगापूर डॉलर देण्यात ये असल्याचे त्यांनी सांगितले. यावर उबाठाचे शैलेश फणसे यांनी ५५लाख डॉलर देण्याची वेळ आली आहे, तर मग आपले विधी विभागाचे अधिकारी काय करत होते असा सवाल करत याला जबाबदार कोण याची माहिती द्यावी असे सांगितले.

## संत गजानन महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त भक्तिमय वातावरण पालखी मिरवणूक



परतूर : प्रतिनिधी : संत गजानन महाराज यांच्या ११६ व्या पुण्यतिथीनिमित्त बाबई येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी गावात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमांत गजानन विजय ग्रंथ पारायण, श्रींचा महाअभिषेक, गावातून श्री गजानन महाराजांच्या पालखीची मिरवणूक तसेच ह.भ.प. भागवताचार्य रामकृष्णशास्त्री महाराज पिंपळगावकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. कीर्तनातून महाराजांच्या भक्ती, विचार व कार्याचा संदेश भाविकांना देण्यात आला. कार्यक्रमानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. हा धार्मिक सोहळा यशस्वी करण्यासाठी ह.भ.प. माऊली महाराज सांगुळे, ह.भ.प. मधुकर महाराज कांबळे यांच्यासह गावातील महिला सेवेकरी, पुरुष सेवेकरी, तरुण वर्ग तसेच प्रतिष्ठित नागरिकांनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतला.

## मराठवाडा मुक्तिसंग्रामातील रणरागिणी दगडाबाई शेळके;निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध लढा देत स्वातंत्र्यासाठी केले धाडसी कार्य

नवनाथ गव्हाणे बदनापूर / प्रतिनिधी : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध धाडसाने लढा देणाऱ्या रणरागिणी दगडाबाई शेळके यांच्या कार्याचे स्मरण होत आहे. विशेष म्हणजे दगडाबाई शेळके यांचे सासर बदनापूर तालुक्यातील धोपटेश्वर येथे असल्याने त्यांच्या शौर्यगाथेशी बदनापूर तालुक्याचेही ऐतिहासिक नाते जोडले गेले आहे. दगडाबाई शेळके यांचा जन्म टाकळी कोलते येथे झाला. लहानपणापासूनच त्यांच्यात धाडसी वृत्ती होती. मराठवाडा निजामाच्या राजवटीखाली असताना स्वातंत्र्यसैनिकांच्या लढ्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. निजामाच्या जुलमी राजवटीविरोधात जनजागृती करताना त्यांनी अनेक संकटांना सामोरे जात स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिले.



स्वातंत्र्यलढ्याच्या काळात दगडाबाईंचे कार्य केवळ आंदोलनापुरते मर्यादित नव्हते. घोड्यावर बसून संदेश पोहोचवणे, स्वातंत्र्यसैनिकांना मदत करणे आणि संघर्षाच्या काळात धाडसाने जबाबदाऱ्या पार पाडणे, अशी विविध कामे त्यांनी केली. त्यांच्या धैर्यामुळे आणि जिद्दीमुळे त्यांचे नाव मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या इतिहासात आदराने घेतले जाते.

**धोपटेश्वरशी जोडले गेले ऐतिहासिक नाते**

स्वातंत्र्यलढ्यातील या रणरागिणीचे सासर धोपटेश्वर येथे असल्याने त्यांच्या कार्याची आठवण बदनापूर तालुक्यासाठी विशेष महत्त्वाची ठरते. धोपटेश्वरच्या मातीत दगडाबाई शेळके यांच्या जीवनाशी जोडलेल्या आठवणी आणि त्यांच्या संघर्षाची गाथा आजही प्रेरणादायी आहे.

१७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या राजवटीतून मुक्त झाला. या मुक्तिसंग्रामात योगदान देणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांमध्ये दगडाबाई शेळके यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या शौर्याची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे.

**रणरागिणीच्या शौर्याला मानाचा मुजरा**

निजामाच्या दडपशाहीसमोर न झुकता स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या दगडाबाई शेळके यांचे धैर्य, त्याग आणि देशप्रेम आजही प्रेरणा देणारे आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या निमित्ताने धोपटेश्वरच्या या रणरागिणीच्या स्मृतींना मानाचा मुजरा.



## गौरी महालक्ष्मी



भारत हा विविध सण, उत्सव आणि परंपरांनी समृद्ध असलेला देश आहे. प्रत्येक सणामागे काही धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व दडलेले असते. महाराष्ट्रात गणेशोत्सवाबरोबरच गौरी महालक्ष्मीचा सण मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जातो. गौरीला माता लक्ष्मीचे रूप मानले जाते. घरात सुख, शांती, समृद्धी आणि आनंद नांदावा, यासाठी गौरी महालक्ष्मीची पूजा केली जाते. गौरी महालक्ष्मीचे आगमन गणेशोत्सवाच्या काळात होते. गौरीच्या आगमनापूर्वी घराची स्वच्छता केली जाते. घरातील वस्तू व्यवस्थित लावल्या जातात आणि परिसर स्वच्छ केला जातो. अंगणात सुंदर रांगोळी काढली जाते. गौरीचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते. काही ठिकाणी गौरीला सजवून घरात आणले जाते, तर काही ठिकाणी तिची स्थापना विशिष्ट पद्धतीने केली जाते. गौरीची स्थापना झाल्यानंतर तिला सुंदर साडी नेसवली जाते. तिच्या अंगावर दागिने, हार, फुले आणि इतर अलंकार घातले जातात. गौरीचे रूप अतिशय सुंदर आणि आकर्षक दिसते. तिच्यासमोर फुलांची सजावट केली जाते. पूजा करण्यासाठी दिवा, अगरबत्ती, फुले, अक्षता, कुंकू, हळद आणि नैवेद्याची तयारी केली जाते. घरातील महिला श्रद्धेने आणि भक्तिभावाने गौरीची पूजा करतात. गौरी महालक्ष्मीच्या सणामध्ये नैवेद्याला विशेष महत्त्व आहे. या दिवशी घरामध्ये विविध प्रकारचे स्वादिष्ट पदार्थ तयार केले जातात. पुरणपोळी, भाजी, आमटी, भात, लाडू, करंजी आणि इतर गोड पदार्थ केले जातात. काही घरांमध्ये विविध प्रकारच्या भाज्या आणि पक्वान्नांचा नैवेद्य दाखवला जातो. सर्वजण एकत्र बसून प्रसाद ग्रहण करतात. या सणाच्या निमित्ताने सुवासिनींना हळदी-कुंकवासाठी घरी बोलावले जाते. त्यांना हळद, कुंकू, फुले आणि भेटवस्तू दिल्या जातात. त्यामुळे महिलांमध्ये प्रेम, मैत्री आणि आपुलकी वाढते. नातेवाईक आणि मित्रमंडळी एकमेकांच्या घरी जाऊन गौरीचे दर्शन घेतात. त्यामुळे कुटुंबातील आणि समाजातील संबंध अधिक दृढ होतात. गौरी महालक्ष्मीचा सण आपल्याला आपल्या संस्कृतीची आणि परंपरांची आठवण करून देतो. आजच्या आधुनिक जीवनशैलीमध्ये अनेक पारंपरिक गोष्टी हळूहळू कमी होत आहेत. अशा वेळी सण आणि उत्सवांमुळे पुढील पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख होते. मुलांना पूजा, रांगोळी, सजावट, पारंपरिक पदार्थ आणि कौटुंबिक परंपरा यांविषयी माहिती मिळते. गौरी महालक्ष्मी हा केवळ धार्मिक विधींचा सण नाही, तर कुटुंबातील प्रेम, एकता, श्रद्धा आणि आनंद वाढवणारा उत्सव आहे. या सणामुळे घरात प्रसन्न वातावरण निर्माण होते. सर्वजण एकत्र येऊन आनंदाने वेळ घालवतात. माता लक्ष्मीच्या कृपेने आपल्या घरात सुख-समृद्धी राहावी, अशी प्रार्थना केली जाते. म्हणूनच गौरी महालक्ष्मीचा सण महाराष्ट्राच्या संस्कृतीतील एक सुंदर आणि महत्त्वाचा सण आहे. या सणाच्या माध्यमातून आपण आपल्या परंपरांचा आदर करावा, कुटुंबातील नातेसंबंध जपावेत आणि सर्वांमध्ये प्रेम व आनंद वाटावा, हा संदेश मिळतो. गौरी महालक्ष्मीचा सण प्रत्येकाच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी घेऊन येवो, हीच मनापासून प्रार्थना.

## मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याये

प्रवीण टाके
उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर



भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.

स्वातंत्र्य मिळाले; पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुअरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार (Standstill -greement) करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्ध संघर्ष वाढत गेला.

हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट काँग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

**मराठवाड्यात जागृतीची बीजे**

मराठवाड्यातील मुक्ती संग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली. १९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले आहे. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

**आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ**

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तीच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले. या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

**दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार**

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्तअटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला. प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

**निजामाची आणि भारताची भूमिका**

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद राज्य भारतीय संघात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदीत या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित केले आहे. स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला. भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय व प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

**भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले**

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता. भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

**१७ सप्टेंबर : मुक्ती संग्राम दिन**

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्ती संग्राम दिवस' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो. विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते.

छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्ती संग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्ती संग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

**इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा**

मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला.

१७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो.

मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला. त्या ज्ञात-अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे. १७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# आदर्श गणेश मंडळाचा स्तुत्य उपक्रम; वर्गणीतून सीसीटीव्ही कॅमेरे बसविले : आदर्श कॉलनीच्या सुरक्षेसाठी पुढाकार; मान्यवरांच्या हस्ते सीसीटीव्ही यंत्रणेचे उद्घाटन

परतूर (प्रतिनिधी) : गणेशोत्सवातील वर्गणीचा उपयोग केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता त्यातून परिसराच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी सुविधा निर्माण करण्याचा स्तुत्य उपक्रम परतूर येथील आदर्श गणेश मंडळ, आदर्श कॉलनीच्या वतीने राबविण्यात आला आहे. मंडळाने जमा झालेल्या वर्गणीतून आदर्श कॉलनी परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असून या सीसीटीव्ही यंत्रणेचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले.

आदर्श गणेश मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत कॉलनीतील नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मंडळाच्या वर्गणीतून परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरावर नियमित नजर ठेवण्यास मदत होणार असून चोरी, गैरप्रकार तसेच संशयास्पद हालचालींना आळा घालण्यासाठीही ही यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे.

सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या उद्घाटनप्रसंगी उपनगराध्यक्ष विजयजी नाना राखे, नगरसेवक संदीप दादा बाहेकर, नगरसेवक प्रवीण काका सातोनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लालजी निर्वळ, प्रकाश बापू अंभुरे, दीपक कुरे, भागवत काकडे, सुरेश गायकवाड, कैलास शेळके सर, संतोष पेंढारे, अरुण धुमाळ, विशाल राऊत, ठाकर सर, राऊत काका, झरेकर सर, कल्याणराव चव्हाण, कुलकर्णी सर, कातारे साहेब, शाम बरकुले सर यांच्यासह आदर्श कॉलनीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गणेशोत्सवाच्या माध्यमातून जमा होणाऱ्या वर्गणीचा काही भाग सामाजिक आणि सार्वजनिक हिताच्या कामासाठी वापरण्याचा मंडळाचा निर्णय नागरिकांमध्ये कौतुकाचा विषय ठरला. उत्सव साजरा करतानाच परिसरासाठी दीर्घकाळ उपयोगी पडणारी सुरक्षा व्यवस्था निर्माण केल्याने आदर्श गणेश मंडळाने इतर मंडळांसमोरही एक चांगला आदर्श निर्माण केला आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे कॉलनीतील प्रमुख मार्ग व परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवणे सुलभ होणार आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही व्यवस्था महत्त्वाची ठरणार आहे. परिसरातील एखादी अनुचित घटना घडल्यास त्याबाबत माहिती मिळविण्यासही सीसीटीव्ही फुटेजची मदत होऊ शकते. उत्सवाबरोबरच समाजोपयोगी कामालाही प्राधान्य हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. आदर्श गणेश मंडळाच्या या सामाजिक उपक्रमाचे उपस्थित मान्यवर व नागरिकांनी स्वागत केले. हवे असल्यास याच बातमीसाठी दैनिक चकमकच्या पेज-१ साठी अधिक आकर्षक हेडिंग आणि २-३ ओळींचा ठळक चौकट मजकूरही तयार करून देतो.

पान १ वरून...

## जुगार अड्ड्यावर

फिर्याद दाखल करण्यात आली असून पुढील तपास पोलिस करीत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक तेजस्वीसिंग संधू, अपर पोलिस अधीक्षक डॉ. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक किरण बिडवे, सपोनि अविनाश गडाख, सपोनि दिनेश बरडे, मनसुख वेताळ, पोहेकॉ सचिन कोकणे, प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, राजेंद्र पवार, विजय बहुरे, पोहेकॉ सागर खैरे, नंदकिशोर जैवाल, हरी जाधव, गोवर्धन हरबक, विशाल हळवे, मतीन पठाण व कारभारी नागवे यांच्या पथकाने केली. अवैध धंद्यांविरोधात कारवाई सुरूच चंदनझिरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### बंगालच्या उपसागरात

सरकेल. उत्तर गंगा खोऱ्यातील पश्चिम बंगालपासून उत्तर ओडिशापर्यंत एक द्रोणी पसरलेली आहे. मध्य आसामवर एक चक्रीय वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. दक्षिण किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश आणि रायलसीमावरही एक चक्रीय वाऱ्यांची स्थिती कायम आहे, तर दुसरी द्रोणी उत्तर अंतर्गत कर्नाटकापासून मन्नारच्या आखातापर्यंत पसरलेली आहे.

**२१ राज्यांना अलर्ट**

दिल्ली, बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड, झारखंड, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, गुजरात, ओडिशा, पंजाब, आसाम, त्रिपुरा, नागालँड, केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटकसह २१ राज्यांना हवामान खात्याने अलर्ट जारी केला आहे. मुसळधरा पावसाचा अंजाद वर्तवण्यात आला आहे. महाराष्ट्रात पुढील चार दिवसांत अनेक भागांत रिमझिम पावसाचा अंदाज हवामान

पान १ वरून...

अभ्यासकांनी वर्तवला आहे. गौरी, गणपतीच्या विसर्जनाच्या दिवशी हलक्या सरींची शक्यता आहे. तर, २० ते २३ सप्टेंबरदरम्यान महाराष्ट्रात पाऊस जोर धरण्याची शक्यता आहे

### नळडोह येथे अच्युत महाराज

स्वामींची उपस्थिती ही या भूमीच्या पवित्रतेची सर्वात मोठी साक्ष आहे. गौळणींच्या भक्तीतून परमार्थ आणि प्रपंचाचा संदेश प्रवचनादरम्यान जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या गौळणींवर बोलताना अच्युत महाराजांनी गौळणींच्या मनातील भावाचे सविस्तर वर्णन केले. या गौळणींच्या माध्यमातून मानवी मनाचा आणि त्यांच्या अंतःकरणाचा वेध घेण्यात आला आहे. ते पुढे म्हणाले, या जगामध्ये गौळणींनी केवळ परमार्थच केला नाही, तर तो आपल्या जीवनात उतरवून त्या अजरामर झाल्या. या पृथ्वीवर आजवर कित्येक राजे-महाराजे आणि श्रीमंत लोक होऊन गेले, ज्यांचे नावही आता कोणाला आठवत नाही. परंतु, पाच हजार वर्षांपूर्वी जन्माला आलेल्या गौळणी आजही अजरामर आहेत. गौळणींनी प्रपंच (संसार) आणि परमार्थ या दोन्ही गोष्टींचा समतोल कसा साधावा, हे संपूर्ण जगाला शिकवले. याच कारणामुळे त्यांनी केलेल्या भक्तीला जगभरात श्रेष्ठ स्थान मिळाले आहे. महाआरती व भव्य अन्नदानाचा सोहळा रोज श्रावण मासानिमित्त पार पडला श्रावण महिन्याचे औचित्य साधून श्री जनार्दन महाराज संस्थान, नळडोह येथे विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली आहे. या महोत्सवाचा भाग म्हणून मंदिरात भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

पान १ वरून...

तसेच दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांसाठी भव्य अन्नदानाचा (महाप्रसाद) कार्यक्रम परंपरेप्रमाणे मोठ्या उत्साहात पार पडला

### हस्तिनापुर गणेश महोत्सवाचा

गंगाआरतीच्या अनोख्या नियोजनामुळे या आगमन सोहळ्याने परतूरकरांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले. परंपरा जपत नवनवीन अनुभव देणे, हेच हस्तिनापुर गणेश महोत्सवाचे वैशिष्ट्य अशी भावना यावेळी उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

### जालना महानगरपालिकेच्या

अधिकाऱ्यांची आहे. मात्र, जर दिवसा वाहनांची पाहणी केली जाते आणि रात्री त्याच वाहनांचे पार्ट चोरीला जात असतील, तर संबंधित यंत्रणेची जबाबदारी नेमकी कुठे आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः महानगरपालिकेचे वाहन प्रमुख कटारे यांच्या कार्यपद्धतीवरही नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. घंटागाड्यांचे स्पेअर पार्ट चोरीला जात असल्याचे त्यांच्या लक्षात कसे येत नाही? वाहनांची नियमित तपासणी होते की नाही? वाहनांच्या सुरक्षेसाठी कोणती व्यवस्था करण्यात आली आहे? तसेच मनपाच्या मालमत्तेची देखरेख करण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्षात किती निगराणी केली जाते, याची चौकशी होण्याची मागणी होत आहे. महानगरपालिकेच्या मालमत्तेची खुलेआम चोरी होत असल्याचे आरोप होत असताना संबंधित अधिकारी मात्र अनभिज्ञ असल्याचे चित्र असेल, तर हा केवळ निष्काळजीपणा नसून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. नागरिकांच्या करातून उभारलेल्या

पान १ वरून...

मालमत्तेचे संरक्षण करणे ही मनपाची प्राथमिक जबाबदारी असताना कोट्यवधींचे वाहन आणि भंगार साहित्य उघड्यावर टाकून प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची महानगरपालिका आयुक्त मॅडम यांनी जातीने दखल घेऊन सखोल चौकशी करावी, अग्निशमन दलाच्या कार्यालयाच्या आवाराची प्रत्यक्ष पाहणी करावी आणि चोरीला गेलेल्या साहित्याची वस्तुनिष्ठ नोंद घेऊन जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी सुज्ञ नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच परिसराला तातडीने संरक्षक भिंत, योग्य प्रकाश व्यवस्था आणि प्रभावी सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणीही होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे मनपाच्या मालमत्तेचे नुकसान होत असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले, तर संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. दरम्यान, आयुक्त यांनी या प्रकरणी तातडीने उपाययोजना न केल्यास जिल्हाधिकारी मॅडम यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात येईल, असा इशाराही काही सुज्ञ नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे. त्यामुळे आता महानगरपालिका प्रशासन या गंभीर आरोपांची दखल घेऊन चौकशीचे आदेश देते का आणि वाहन विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होते का, याकडे जालना शहराचे लक्ष लागले आहे.

**मोरया प्रतिष्ठान गणेश**

उपक्रमांची चर्चा सुरू झाली आहे. मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गणेशोत्सव काळात आणखी विविध उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला आहे.

# १ ऑक्टोबरपासून या राज्यात मिळणार नाही पेट्रोल-डिझेल

हरियाणात १ ऑक्टोबर २०२६ पासून एक मोठा बदल लागू होणार आहे. सरकारच्या नवीन आणि कठोर निर्देशानुसार, वाहनांमध्ये आता सरसकट पेट्रोल किंवा डिझेल भरता येणार नाही. 'कमिशन फॉर एअर क्वालिटी मॅनेजमेंट'ने (उ-टच्) जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत, हरियाणा सरकार 'नॅशनल कॅपिटल रिजन' (छउठ) अंतर्गत येणाऱ्या प्रमुख जिल्ह्यांमध्ये एक अत्यंत कडक नियम लागू करत आहे. यामध्ये गुरुग्राम, फरिदाबाद, सोनीपत आणि जज्जर यांचा समावेश आहे. या नवीन नियमानुसार, जर तुमचे वाहन पर्यावरणीय मानकांची पूर्तता करत नसेल किंवा त्याचे विहित आयुर्मान (वापराचा कालावधी) संपले असेल, तर १ ऑक्टोबरपासून तुम्हाला पेट्रोल पंपांवर एक लिटरही इंधन मिळणार नाही. हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी या नियमाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक तांत्रिक व्यवस्थेला मंजुरी दिली असून, यामुळे जुन्या वाहनांच्या मालकांच्या अडचणी वाढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. हा निर्णय का घेण्यात आला?

दिल्ली-एनसीआर (ऊश्रश्रहळ-छउठ) बराच काळापासून हवेच्या खराब गुणवत्तेच्या समस्येचा सामना करत आहे आणि जुन्या वाहनांमधून होणारे उत्सर्जन हे यातील एक प्रमुख कारण मानले जाते. सर्वोच्च न्यायालय आणि नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल (छॠढ) यांनी यापूर्वीच अशा वाहनांवर निर्बंध घालण्याबाबत कठोर आदेश दिले



आहेत. हरियाणा सरकारचे असे मानणे आहे की, इंधन भरण्याच्या केंद्रांवर अशा वाहनांची ओळख पटवल्यास रस्त्यांवरील त्यांची संख्या आपोआप कमी होईल, कारण इंधनाशिवाय ती वाहने फार काळ चालू शकत नाहीत.

हा नियम विशेषतः अशा वाहनांना लागू होईल ज्यांनी नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल आणि सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या वयोमर्यादेचे उल्लंघन केले आहे. साधारणपणे, १५ वर्षांपेक्षा जुनी पेट्रोल वाहने आणि १० वर्षांपेक्षा जुनी डिझेल वाहने या श्रेणीत येतात. १ ऑक्टोबरपासून, एनसीआर (छउठ) क्षेत्रातील कोणत्याही पेट्रोल पंपावर अशा वाहनांना इंधन दिले जाणार नाही; मग ती वाहने चालू स्थितीत असोत किंवा नसोत. या नियमाची अंमलबजावणी कशी तपासली जाईल? या नियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी, हरियाणा परिवहन विभाग एनसीआर (छउठ) क्षेत्रातील गुरुग्राम, फरिदाबाद, सोनीपत आणि झज्जर या चार जिल्ह्यांमधील पेट्रोल पंपांवर 'ऑटोमेटेड नंबर प्लेट रिकग्निशन' कॅमेरे बसवत आहे. पहिल्या टप्प्यात ७७५ कॅमेरे बसवले जातील; या प्रकल्पाला ४१.७४ कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. हे कॅमेरे पेट्रोल पंपावर येणाऱ्या प्रत्येक वाहनाची नंबर प्लेट स्कॅन करतील. जर एखाद्या वाहनाची मुदत संपली असेल, तर ही प्रणाली आपोआप अलर्ट देईल, ज्यामुळे पंप चालकाला त्या वाहनात इंधन भरण्यास नकार देणे शक्य होईल. संपूर्ण राज्यात किती कॅमेरे बसवले जातील? सध्या ही प्रणाली एनसीआर क्षेत्रातील गुरुग्राम, फरिदाबाद, सोनीपत आणि झज्जर या चार जिल्ह्यांमध्ये राबवली जात असून, हा या प्रकल्पाचा पहिला टप्पा आहे. सरकारी अंदाजानुसार, संपूर्ण हरियाणात अशा देखरेखीसाठी सुमारे २७८० कॅमेऱ्यांची आवश्यकता असेल आणि हे कॅमेरे टप्प्याटप्प्याने राज्यभर बसवले जातील. थोडक्यात सांगायचे तर, जरी या उपक्रमाची सुरुवात एनसीआरपासून होत असली, तरी भविष्यात हा नियम संपूर्ण राज्यात लागू करण्याची योजना आहे.

**मुक्ती लढा ..**

मराठवाडा संग्राम
अमृत योग साजरा
सामील हो उस्फुर्त
कुणी नको लाजरा

नमोस्तुते स्वतंत्रते
नभीघुमो जयकारा
अंतरातून जयघोष
समस्त जन पुकारा

भेदभाव जातीवाद
त्यागा क्रुर विकारा
भारतीय आहो सारे
एकचं धर्म स्विकारा

बांडगुळी वृत्ती नको
जाणा आत्म निर्भरा
नव निर्मीती गंगोत्री
वाहू दे मुक्त निर्झरा

सर्व क्षेत्री अग्रस्थानी
तिरंग्यास रे उंच धरा
मागास न मराठवाडा
मान्य करी सारी धरा

धन्यवाद शब्दअधरा
इतिहासा याद करा
मराठवाडाप्रगतीपथ
रे सलाम संग्राम विरा

ज्ञात अज्ञात शहीदा
सार्थ बलिदान स्मरा
रक्त सांडले रे त्यांनी
अक्ष भिजू द्या जरा

– हेमंत मुसरीफ पुणे
9730306996

**शिलान्यास ...**

कुर्निसात शहिदांस
ताजा करे इतिहास
मुक्तीसंग्रामा मुळेचं
भविष्या मुक्त श्वास

मराठवाडा मागास
खूप झाला उपहास
आम्हासोडून इतरत्र
फिरत राही विकास

जल संकट भयाण
आश्वासनी आभास
योजनासंकल्प विरे
रे तोंडास पाने फास

पॅकेजचा रे उपहास
फसवणूक स-हास
प्रत्यक्षात नसे मदत
हात आखडेदुस्वास

जराशीबदले स्थिती
दुणावेआत्मविश्वास
उज्वलताआकारांस
परिपूर्ण रेअपन्यास

निश्चीत करू प्रगती
नवपिढीचा विश्वास
साजरा तेंव्हा उत्सव
बसू नव शिलान्यास

उभारे आत्मविश्वास
आता प्रगति ध्यास
प्रगत हो मराठवाडा
आदरांजली रे खास

– हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996

पान ४ वरून

### रेल्वे प्रश्नांवर खा. डॉ. कल्याण

RUB/ROB उभारण्याची मागणी खासदार डॉ. काळे यांनी केली. नवीन रेल्वे मार्ग व औद्योगिक विकासालाही प्राधान्य जालना-जळगाव (अजिंठा) नवीन रेल्वे मार्ग, जालना-खामगाव रेल्वे मार्ग तसेच छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर आणि धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या प्रस्तावित रेल्वे मार्गांबाबत रेल्वे प्रशासनाच्या स्तरावरील सद्यस्थिती व पुढील कार्यवाहीची माहिती देण्याची मागणी करण्यात आली. जालना औद्योगिक क्षेत्रातील स्टील उद्योगासह कृषी व व्यापारी क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन मालधक्का, पार्सल व लॉजिस्टिक सुविधा सक्षम करण्यावरही खासदार डॉ. काळे यांनी भर दिला. प्रत्येक विषयाचा -TR देण्याची मागणी बैठकीदरम्यान खासदार डॉ. काळे यांनी केवळ आश्वासनांवर समाधान न मानता प्रत्येक प्रलंबित विषयाची सद्यस्थिती, प्रस्ताव कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे, आवश्यक मंजुरी, पुढील कार्यवाही करणारा अधिकारी आणि अपेक्षित पूर्णता कालमर्यादा यांचा स्पष्ट तपशील मागितला. तसेच या सर्व विषयांबाबतचा -लींळेप ढरज्ञशप ठर्शिीीं (-ढठ) खासदार कार्यालयास उपलब्ध करून द्यावा आणि जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रेल्वे प्रश्नांवर दर तीन महिन्यांनी खासदार-रेल्वे विभाग समन्वय आढावा बैठक आयोजित करावी, अशी मागणी त्यांनी केली. जनतेच्या दैनंदिन प्रवासाशी, सुरक्षिततेशी, रोजगाराशी, उद्योगाशी आणि पर्यटनाशी निगडित रेल्वे प्रश्नांना केवळ कागदोपत्री पाठपुराव्यापुरते मर्यादित न ठेवता त्यांचे प्रत्यक्ष परिणाम दिसले पाहिजेत, या भूमिकेतून खासदार डॉ. कल्याण काळे यांनी नांदेड येथे रेल्वे प्रशासनासमोर जिल्ह्यातील प्रश्नांची

पान ४ वरून

प्रभावी मांडणी केली. त्यामुळे आता संबंधित प्रलंबित प्रस्तावांवर रेल्वे प्रशासनाकडून कोणती ठोस आणि कालबद्ध कार्यवाही केली जाते, याकडे जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### जालन्यात २५ सप्टेंबरपासून

आयडी उपलब्ध असल्यास एफएफएस पमध्ये राज्याची निवड करून फार्मर आयडी आणि आधारशी लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेल्या ओटपीच्या माध्यमातून लॉगिन करता येईल. त्यानंतर संबंधित जमीन माहिती प्रणालीमध्ये उपलब्ध होऊ शकते.

फार्मर आयडी उपलब्ध नसलेल्या शेतकऱ्यांना आधार क्रमांकाच्या आधारेही अर्ज करता येणार आहे. यासाठी आधार क्रमांकाशी मोबाईल क्रमांक लिंक असणे आवश्यक आहे. जमीन मालकी किंवा कसणाऱ्याची श्रेणी निवडल्यानंतर सर्व्हे क्रमांक, गाव, जिल्हा आणि हेक्टरमधील क्षेत्रफळाची माहिती भरावी लागेल. जमीन माहितीची पडताळणी करून अर्ज सादर करता येईल.

नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्याने संबंधित पीक निवडावे. निवडलेल्या पिकाचे क्षेत्रफळ लक्षात घेऊन पमध्ये जीएफआर नुसार खताची शिफारस उपलब्ध होईल. त्यानुसार आवश्यक खताचा प्रकार आणि गोण्यांची संख्या निवडता येईल. त्यानंतर उपलब्धतेनुसार खत विक्रेत्याची निवड करता येईल. वेगवेगळी खते वेगवेगळ्या दुकानांमध्ये उपलब्ध असल्यास एकापेक्षा अधिक विक्रेते निवडण्याची सुविधाही प्रणालीमध्ये आहे. अर्ज सादर केल्यानंतर शेतकऱ्याला युनिक क्युआर कोड आणि टोकन नंबर मिळेल. हा क्युआर कोड मोबाईलमध्ये जतन करून ठेवावा. निवडलेल्या विक्रेत्याच्या दुकानात जाऊन क्युआर कोड दाखवल्यानंतर खताची खरेदी करता येईल. बुकिंगनंतर तीन दिवसांची मुदत खताची बुकिंग केल्यानंतर क्युआर कोड

पान ४ वरून

किंवा टोकन नंबर प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत रासायनिक खताची खरेदी करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी शेतकऱ्यांनी एफएफएस प मोबाईलमध्ये डाउनलोड करून आगाऊ नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. फार्मर आयडी उपलब्ध असल्यास त्याचा वापर करावा. आधार क्रमांकाशी मोबाईल क्रमांक लिंक असल्याची खात्री करावी. जमीन व पिकाची माहिती अचूक भरावी आणि पमध्ये उपलब्ध जीएफआरनुसार खताची आवश्यकता तपासावी. खत विक्रेता निवडल्यानंतर प्राप्त झालेला क्युआर कोड व टोकन नंबर जतन करून ठेवावा. शेतकऱ्याच्या वतीने प्रतिनिधी खत खरेदीसाठी जाणार असल्यास त्याचा आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक आवश्यक राहणार असून, प्रतिनिधीकडे स्वतःचे आधार कार्ड आणि संबंधित क्युआर कोड असणे आवश्यक आहे.

गुगल प्ले स्टोअरवर प उपलब्ध "Framework for Fertilizer Sale - Ministry of -griculture' हे प गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी ते डाउनलोड करून २५ सप्टेंबरपूर्वी नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एफएफएस प्रणालीमुळे खत खरेदीसाठी होणारी गर्दी व लांब रांगा टाळण्यास मदत होणार असून, जवळच्या विक्रेत्याकडे उपलब्ध खताची माहिती घेऊन आगाऊ नियोजन करता येणार आहे. डिजिटल प्रक्रियेमुळे खत वितरणात पारदर्शकता वाढण्यास मदत होईल. जालना जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी एफएफएस प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करून खत खरेदीची प्रक्रिया सुलभ व नियोजनबद्ध करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, सहाय्यक

पान ४ वरून

कृषी अधिकारी, खत विक्रेते, गुण नियंत्रण निरीक्षक, खत उत्पादक कंपन्यांचे जिल्हा प्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये एफएफएस प्रणालीबाबत व्यापक जनजागृती करून आवश्यक मार्गदर्शन करावे, असेही प्रशासनाने सूचित केले आहे. कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, जालना आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांनी शेतकऱ्यांना ऋऋड प्रणालीचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

### मराठवाड्याच्या रखडलेल्या

स्तरावर आंदोलने करण्यात आली असून, सातही जिल्हाधिकाऱ्यांसमवेत संबंधित जिल्ह्यांतील विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली आहे. या जनआंदोलनाच्या माध्यमातून मराठवाड्यातील २४ अपूर्ण विकासकामांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी करण्यात आली. या दौऱ्यादरम्यान शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन करपलेल्या पिकांची पाहणी करण्यात आली. अनेक भागांतील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या आहे. या जनआंदोलन अंतर्गत १७ सप्टेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे सकाळी ११.३० वाजता शिवसैनिकांसमवेत या धरणे आंदोलनात सहभागी होणार आहेत. मराठवाड्याच्या विकासासाठी करण्यात आलेल्या घोषणा कागदावर न राहता प्रत्यक्षात पूर्ण कराव्यात, रखडलेले प्रकल्प मार्गी लावावेत आणि विकासाचा अनुशेष भरून काढावा, या मागण्यांसाठी शिवसेनेने हे आंदोलन तीव्र केले आहे. या धरणे आंदोलनात मराठवाड्यातील शिवसैनिक, पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रेल्वे प्रश्नांवर खा. डॉ. कल्याण काळे यांचा नांदेडमध्ये आक्रमक पाठपुरावा; मुकुंदवाडी गेट क्र. ५६ सह २० महत्त्वाच्या मागण्यांवर कालबद्ध कार्यवाहीची मागणी

नांदेड : जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांच्या सुविधा, रेल्वे सुरक्षा, नवीन रेल्वे सेवा, पायाभूत सुविधा, औद्योगिक मालवाहतूक तसेच प्रलंबित रेल्वे प्रकल्पांना गती देण्यासाठी जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी नांदेड येथे विभागीय रेल्वे व्यवस्थापकांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी रेल्वे विभागाकडे यापूर्वी करण्यात आलेल्या विविध मागण्यांचा आढावा घेत प्रत्येक विषयावर तातडीने आणि कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्याचे निर्दे शात्मक स्वरूपात आवाहन केले.

खासदार डॉ. काळे यांनी विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना दोन स्वतंत्र पत्रे प्रत्यक्ष सुपूर्द केली. यामध्ये मुकुंदवाडी येथील रेल्वे गेट क्र. ५६ येथे ठ्णइ/ठ्जइ उभारण्याच्या प्रलंबित प्रस्तावाला अंतिम मंजुरी देऊन प्रत्यक्ष काम सुरू करण्याचा विषय विशेषत्वाने मांडण्यात आला. रेल्वे गेट वारंवार बंद होत असल्याने नागरिक, विद्यार्थी, कामगार, रुग्ण आणि व्यावसायिकांना वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे केवळ प्रशासकीय पत्रव्यवहार न करता या कामासाठी आवश्यक मंजुरी, निविदा प्रक्रिया आणि प्रत्यक्ष बांधकामाची निश्चित कालमर्यादा ठरवावी, अशी स्पष्ट भूमिका खासदार डॉ. काळे यांनी मांडली. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी आणि सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवता येणार नाहीत. प्रस्ताव कोणत्या स्तरावर आहे यापेक्षा प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार, हे महत्त्वाचे आहे, अशी भूमिका त्यांनी चर्चेदरम्यान स्पष्ट केली.

जालना–छत्रपती संभाजीनगर परिसरातील प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन वंदे भारत एक्स्प्रेस, जालना–छपरा रेल्वे सेवा, पूर्णा–पटना रेल्वे छत्रपती संभाजीनगरपर्यंत वाढविणे, अजंता एक्स्प्रेस मुंबईपर्यंत विस्तारित करणे तसेच जालना–नगरसोल ऊ्एचण मनमाडपर्यंत वाढविणे, या मागण्यांवरही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच छत्रपती संभाजीनगर–जालना दरम्यान नियमित ऊ्एचण/चएचण/शटल सेवा सुरू करण्याबाबत व्यवहार्यता तपासून प्रस्ताव सादर करावा, अशी मागणी खासदार डॉ. काळे यांनी केली. मराठवाड्यातील नागरिकांना मुंबई, पुणे, सूरत, अहमदाबाद, नागपूर, मडगाव, कोल्हापूर आणि नाशिकसह प्रमुख शहरांशी अधिक चांगली रेल्वे कनेक्टिव्हिटी मिळावी, यासाठी नवीन रेल्वे सेवा व अतिरिक्त फेऱ्यांचा प्रस्ताव तयार करण्याची मागणीही त्यांनी केली.

गणेशोत्सवाच्या काळात मराठवाडा–कोकण रेल्वे कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी नांदेड–हडपसर गणपती विशेष रेल्वे सावंतवाडी रोडपर्यंत वाढविण्याची मागणीही खासदार डॉ. काळे यांनी यापूर्वी केली आहे. करमाडसह स्थानकांच्या विकासावर भर छत्रपती संभाजीनगर, मुकुंदवाडी, करमाड, बदनापूर आणि जालना रेल्वे स्थानकांवरील प्रवासी सुविधांचा स्वतंत्र आढावा घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली. विशेषतः करमाड रेल्वे



स्थानकाचा सर्वांगीण विकास, मूलभूत सुविधा आणि प्रवाशांच्या मागणीनुसार महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांना थांबा देण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याची सूचना करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर व जालना रेल्वे स्थानकांवरील वाढता प्रवासी भार लक्षात घेऊन प्लॅटफॉर्म, लिफ्ट, एस्कलेटर, प्रतीक्षालय, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, पार्किंग, डिजिटल माहिती व्यवस्था आणि दिव्यांगांसाठीच्या सुविधांचा आढावा घेण्याची मागणीही करण्यात आली. रेल्वे सुरक्षा प्रश्नांकडेही गांभीर्याने लक्ष मुकुंदवाडी गेट क्र. ५६ व्यतिरिक्त गेवराई रेल्वे स्टेशनजवळील देमणी शिवार–शेवगावाडी परिसरातील पोल क्र. १४८/४ ते १४८/५ दरम्यान अंडरपास, तसेच जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील धोकादायक रेल्वे क्रॉसिंगचे सर्वेक्षण करून आवश्यक ठिकाणी (पान ३ वर)




प्रल्हादपूर येथील व्यापारी गणेश मंडळ



नवतरुण गणेश मंडळ सन्मित्र कॉलनी परतुर अध्यक्ष आकाश वनवे सचिव नितीन शिंदे उपाध्यक्ष लक्ष्मण हरकळ खजिनदार सुनील पुंड



देशपांडे गल्ली गाव परतुर येथील हनुमान गणेश मंडळ

## जालन्यात २५ सप्टेंबरपासून खत विक्रीसाठी एफएफएस प्रणाली

जालना/प्रतिनिधी : केंद्र शासनाच्या अनुदानित रासायनिक खतांच्या विक्री प्रक्रियेत पारदर्शकता, सुलभता आणि गतिमानता आणण्यासाठी विकसित करण्यात आलेली Framework for Fertilizer Sale (FFS) ही मोबाईल आधारित प्रणाली जालना जिल्ह्यात २५ सप्टेंबर २०२६ पासून लागू करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खत खरेदीपूर्वी FFS प्रणालीवर आवश्यक नोंदणी व आगाऊ बुकिंग प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी, जालना यांनी केले आहे.

केंद्र शासनाकडून सध्या ई–पॉस मशीनद्वारे कृषी सेवा केंद्रांमार्फत अनुदानित रासायनिक खतांची विक्री केली जाते. त्र्र्रू प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आपल्या मोबाईलवरून खताची गरज नोंदविता येणार असून, जमीन क्षेत्र व निवडलेल्या पिकाच्या आधारे General Fertilizer Recommendation (GFR) अंतर्गत खताची शिफारस केलेली मात्रा पाहता येणार आहे. तसेच जवळील उपलब्ध खत विक्रेत्याची निवड करून QR Code Am{U




Token Number मिळविता येणार आहे. महाराष्ट्रात या प्रणालीची पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर जिल्ह्यात अंमलबजावणी करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात आणखी नऊ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला. आता तिसऱ्या टप्प्यात जालना जिल्ह्यासह उर्वरित जिल्ह्यांमध्ये २५ सप्टेंबरपासून एफएफएस प्रणाली लागू केली जाणार आहे. शेतकऱ्याकडे फार्मर(पान ३ वर)

## सेलू तहसीलमधील कर्मचाऱ्यांच्या मनमानी वेळेला लगाम घाला

**सेलू –प्रतिनिधी (योगेश राऊत):** तहसील कार्यालयातील पुरवठा विभागासह विविध शाखांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शासनाने निश्चित केलेल्या कर ार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन करावे, अशी मागणी ग्रामीण भागातून कामासाठी येणाऱ्या नागरिकांकडून होत आहे. काही अधिकारी व कर्मचारी वेळेवर उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रार आहे.

**‘एकाच कामासाठी वारंवार चकरा नको’**
**दूरवरच्या गावांतून तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचा प्रवासखर्च आणि संपूर्ण दिवस खर्ची पडतो. त्यामुळे अधिकारी–कर्मचारी निश्चित वेळेत कार्यालयात उपलब्ध राहावेत आणि नागरिकांची कामे शक्यतो त्याच दिवशी मार्गी लावावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

तहसील कार्यालयात रेशन कार्ड, धान्य वाटप, नवीन नाव नोंदणी, नावातील दुरुस्ती तसेच विविध शासकीय कामांसाठी दररोज सेलू तालुक्यातील गावांमधून नागरिक येतात. अनेकांना प्रवासाचा खर्च करून आणि आपली दैनंदिन कामे सोडून तहसील गाठावी लागते. मात्र संबंधित कर्मचारी जागेवर उपलब्ध नसल्यास त्यांना एकाच कामासाठी वारंवार चकरा माराव्या लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः सकाळी कार्यालय सुरू होण्याच्या वेळेनंतर उशिरा उपस्थित राहणे तसेच सायंकाळी कार्यालयीन वेळ पूर्ण होण्यापूर्वीच कार्यालय सोडण्याच्या प्रकारांबाबत नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत. त्यामुळे महत्त्वाची कामे वेळेत होत नसल्याचा आरोपही करण्यात येत आहे. तहसीलदारांनी या प्रकाराची दखल घेऊन सर्व विभागांतील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती व कार्यालयीन वेळेची नियमित तपासणी करावी. बायोमेट्रिक उपस्थितीची काटेकोर अंमलबजावणी करून नागरिकांना वेळेत सेवा मिळेल याची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## समान काम, समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

### मागण्या मंजूर न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप; १६ सप्टेंबरपासून आंदोलनाला सुरुवात

अंबड (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट–क) संलग्न जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेने न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे. समान कामासाठी समान वेतनासह अन्य मागण्यांवर शासनाने निर्णय न घेतल्यास टप्प्याटप्प्याने आंदोलन तीव्र करून १७ नोव्हेंबरपासून राज्यातील न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेने यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकानुसार, न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा वेतनवाढीचा प्रश्न सन २००६ पासून प्रलंबित आहे. राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत सुमारे ३४ हजार कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात न्यायालयीन कर्मचारी संघटनेने वारंवार शासनाकडे पाठपुरावा केला; मात्र मागण्यांवर अपेक्षित निर्णय झाला नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. दरम्यान, आंदोलनाची कार्यदिशा निश्चित करून त्याबाबत शासन व उच्च न्यायालयाला नोटीस देण्यात आल्याचे संघटनेने म्हटले आहे. न्यायालयीन व्यवस्थेतील



कर्मचाऱ्यांच्या वेतनविषयक मागण्या, रिक्त पदे, अपुरी कर्मचारी संख्या तसेच वाढत्या कामाच्या ताणासंदर्भात तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, न्यायालयांमध्ये अपुरी कर्मचारी संख्या, रिक्त पदे आणि वाढलेले खटले यामुळे कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण वाढत आहे. शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार ५०० खटल्यांसाठी एक न्यायालय स्थापन करण्याची आवश्यकता असतानाही पुरेशा प्रमाणात न्यायालयांची स्थापना झालेली नसल्याचा दावा संघटनेने केला आहे. त्यामुळे प्रलंबित खटल्यांची संख्या वाढत असून कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडत असल्याचे संघटनेने नमूद केले. आंदोलनाचे टप्पे संघटनेने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार १६ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून काम, त्यानंतर १६ व १७ ऑक्टोबर रोजी दोन दिवस काळ्या फिती लावून काम, ५ नोव्हेंबर रोजी एक दिवस सामूहिक रजा आंदोलन करण्यात येणार आहे. त्यानंतरही मागण्यांवर निर्णय न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून राज्यभरातील दुय्यम न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. न्यायव्यवस्थेचा कणा मजबूत ठेवण्यासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविणे आवश्यक असून, शासनाने वेतनासह प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेने केली आहे.

## प्रथमाचार्य शांतिसागरजी महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव साजरा

जालना/प्रतिनिधी : दिगंबर जैन समाजाच्या आध्यात्मिक परंपरेतील चरित्रचक्रवर्ती प्रथमाचार्य श्री १०८ शांतिसागरजी महाराज यांचा ७१ वा पुण्यतिथी महोत्सव रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी रुक्मिणी गार्डनमध्ये प. पू. वात्सल्यमूर्ती आचार्य पवित्रसागर महाराज, प. पू. मुनी प्रशांतसागर महाराज व प. पू. मुनी प्रभावसागर महाराज यांच्या ससंघ सान्निध्यात आणि अखिल दिगंबर जैन सैतवाल संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला.

आचार्य श्री पवित्रसागरजी महाराज तसेच मुनिश्री प्रशांतसागरजी महाराज व मुनिश्री प्रभावसागरजी महाराज यांनी प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी महाराज यांनी शांतीसागरजी महाराज यांच्या कठोर तपश्चर्या, त्याग, संयम, चारित्र्य, अहिंसा आणि आत्मसाधनेचे स्मरण करून त्यांच्या आदर्श जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले तर दिलीप घेवारे यांनी आचार्य शांतिसागर महाराजांच्या त्याग, तपश्चर्या व संयममय जीवनाचे स्मरण करून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. आचार्य श्री शांतिसागरजी महाराजांनी दिगंबर जैन



साधू परंपरेच्या जतन व पुनरुज्जीवनासाठी केलेले कार्य, देशभर केलेला पायी विहार आणि आपल्या कठोर साधनेतून समाजाला दिलेली धर्मप्रेरणा याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यांच्या पवित्र जीवनकार्यामुळे आजही असंख्य श्रावक–श्राविकांना धर्ममार्गाची प्रेरणा मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पुण्यतिथी महोत्सवानिमित्त मंदिरात अभिषेक, भव्य मिरवणूक, समाधी दिवस महोत्सव, मुनिसंघाचे आशीर्वचन आणि वात्सल्य भोजन आदी कार्यक्रम पार पडले. समाजबांधवांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवून श्री शांतिसागरजी महाराज यांच्या चरणी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी राहुल पालंबे, पवन आंबूरे, महावीर लव्हाडे, अजित छाबडा, संजय लव्हाडे, दीपक जैन, गणेश काळे, धनराज जैन, अमोल मोगले, निलेश सावळकर, दिलीप काळजाते, सुरेश अग्रवाल, राहुल काळे, महावीर काळे, चंद्रकांत गुंगे, पारस काळे यांच्यासह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव मेहेत्रे यांनी केले. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी पार्श्व पवित्र सेवा समिती, आणि सकल जैन समाजाने विशेष परिश्रम घेतले.

## मराठवाड्याच्या रखडलेल्या विकासकामांवर शिवसेनेचा एल्गार

### मराठवाड्याचा विकास तुमसे ना हो पायेगा!’ जनआंदोलनाचा आज निर्णायक टप्पा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सहभागी होणार

छत्रपती संभाजीनगर : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त मराठवाड्याचा विकास आणि विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी शिवसेना – उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने ‘मराठवाड्याचा विकास तुमसे ना हो पायेगा!’ हे जनआंदोलन पुकारले आहे. १ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या या जनआंदोलनाच्या माध्यमातून मराठवाड्यातील रखडलेली विकासकामे, अपूर्ण प्रकल्प आणि विविध मंत्रिमंडळ बैठकीत केलेल्या घोषणांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे. मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी विविध सरकारांच्या काळात छत्रपती संभाजीनगर येथे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठका




घेण्यात आल्या. सप्टेंबर २०१६ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच १६ सप्टेंबर २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाड्याच्या विकासासाठी बैठका झाल्या. या बैठकींमध्ये विविध विकासकामे, प्रकल्प आणि सिंचन प्रकल्पांच्या घोषणा करण्यात आल्या. मात्र, अनेक निर्णय अद्याप अपूर्ण अवस्थेत आहे. शिवसेना नेते, आमदार तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या संयोजकतेखाली १ सप्टेंबरपासून मराठवाड्यातील सात जिल्ह्यांमध्ये व्यापक जनआंदोलन करण्यात आले. विविध ठिकाणी तहसील कार्यालये व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये निवेदने देण्यात आली. जिल्हा (पान ३ वर)